# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी अकोला यांचे कार्यालय, अकोला

दूरध्वनी क्र. 0724-2424442 फॅक्स 0724-2435007

email address -rdc_akola@rediffmail.com web address :www.akolanic.in


क्र.कक्ष2/गृह/प्र.स./कावि.334/2020 दिनांक: 21 /05/2020

**वाचा-** महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांचे नोटीफीकेशन क्र. No.DMU/२०२०/CR.९२/DisM-१ दिनांक १९ मे २०२०

## ( फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 अन्वये आदेश )

## आदेश

**ज्याअर्थी,** जागतिक आरोग्य संघटनेने कोरोना विषाणूमुळे पसरत असलेल्या आजार हा साथीचा संसर्गजन्य आजार म्हणून संपूर्ण जगात घोषित केलेला आहे. सध्या भारतात व महाराष्ट्रात कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव गतीने पसरत असल्याचे दिसून येत आहे. त्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने राज्यात साथीचा **रोग प्रतिबंधक कायदा** 1897 दिनांक 13.3.2020 पासून लागू करून, त्यासंबंधी सूचना निर्गमित केलेली आहे. भारत सरकार आरोग्य मंत्रालयाने वेगवेगळे आदेश निर्गमित करुन हा आजार पसरू नये याकरिता लोकांनी एकाच ठिकाणी एकत्रित येण्यावर, प्रवासावर, करण्यावर प्रतिबंध घातलेला आहे. सदर कोरोना विषाणूच्या वाढता प्रादुर्भाव पाहता काही अत्यावश्यक प्रतिबंधात्मक आदेश पारित करणे अत्यंत गरजेचे आहे. जेणेकरून कोरोना विषाणूच्या होणारा संसर्ग रोखणे व प्रतिबंध करणे शक्य होणार आहे. **आणि**

**ज्याअर्थी,** दिनांक 17 मे 2020 रोजीचे आदेशानुसार अकोला जिल्हयामध्ये कोरोना विषाणूचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता दिनांक 31 ते 2020 चे मध्यरात्रीपर्यंत संचारबंदी लावण्याचे आदेश पारीत करण्यात आले आहे. **आणि**

**ज्याअर्थी,** सदर कर्फ्यूमध्ये वाढ करण्याची नितांत आवश्यकता वाटल्याने महाराष्ट्र शासनाचे दिनांक 19 मे 2020 चे मागदर्शक पत्रानुसार दिनांक 22.05.2020 ते दिनांक 31.05.2020 या कालावधीमध्ये सांयकाळी 07.00 वाजेपासून दुस-या दिवशीचे सकाळी 07.00 वाजपर्यंत रात्रीची संचारबंदी लावणे बाबत निर्णय घेण्यात आल्याने क्रिमिनल प्रोसीजर कोड 1973 मधील कलम 144 लागू करणे आवश्यक असल्याची माझी खात्री झालेली आहे.

**त्याअर्थी** मी जितेंद्र पापळकर भाप्रसे जिल्हादंडाधिकारी अकोला क्रिमिनल प्रोसीजर कोड 1973 मधील कलम 144 अन्वये मला असलेल्या अधिकारास अनुसरून दिनांक 22.05.2020 ते दिनांक 31.05.2020 या कालावधीमध्ये सांयकाळी 07.00 वाजेपासून दुस-या दिवशीचे सकाळी 07.00 वाजेपर्यंत अकोला जिल्हा संपूर्ण कार्यक्षेत्रामध्ये रात्रीची संचारबंदी क्रिमिनल प्रोसीजर कोड 1973 मधील कलम 144 अन्वये आदेश निर्गमित करीत आहे. या आदेशानुसार कोणत्याही व्यक्तींना या कालावधीत मुक्त संचार करता येणार नाही.

तसेच उक्त ठिकाणी सर्व संबंधितांना आदेशापूर्वी स्वतंत्र नोटीस बजावणे शक्य नसल्याने फौजदारी दंड संहिता 1973 चे कलम 144 (2) अन्वये प्राप्त अधिकारानुसार सदरच्या आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे.

सदरचा आदेश पोलीस आरोग्य सेवा व अत्यावश्यक सेवा व वस्तू यांची वाहतुक, कोरोना विषाणूचा संसर्ग व प्रसार टाळण्यासाठी कार्यरत संबंधित आपत्ती निवारण व्यवस्थापन मधील अधिकारी व कर्मचारी तसेच माझ्या वतीने परवानगी दिलेल्या व्यक्तींना लागू नसतील.

..२..

उपरोक्त आदेशाचे पालन न करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने अथवा संस्थेने भारतीय दंड संहिता – १८६० (४५) यांच्या कलम १८८, २६९, २७०, २७१ अन्वये फौदारी कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर आदेश आज दिनांक 21 मे 2020 रोजी माझे स्वाक्षरी व शिक्यानिशी निर्गमित करण्यात येत आहे.

जिल्हादंडाधिकारी अकोला कार्यालय

**(जितेंद्र पापळकर, भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**
**अकोला**
जिल्हादंडाधिकारी,अकोला

**प्रतिलिपी -**

१. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई
२. उपसचिव, महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभाग मंत्रालय मुंबई
३. मा. आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती.
यांना माहिती करिता सादर
४. **जिल्हा पोलीस अधिक्षक**, अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
५. **आयुक्त महानगर पालिका,** अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव
६. **अधिष्ठाता , शासकीय वैद्यकिय महाविद्यालय अकोला** अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव
७. **जिल्हा शल्य चिकित्सक सामान्य रुग्णालय, अकोला / जिल्हा आरोग्य अधिकारी**, यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव
८. **उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी/ तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी --------------** सर्व.
९. **अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, विभाग, अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.**
१०. **पोलीस निरिक्षक--------------------------- सर्व**
११. **मुख्याधिकारी** ------------------------------------------- मार्फत **जिल्हा प्रशासन अधिकारी, अकोला,** यांनी नगर परिषद / नगर पंचायत कार्यक्षेत्रामध्ये उपरोक्त आदेशाची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्याचे दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करावी.
१२. **जिल्हा माहिती अधिकारी, अकोला** यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव. त्यांनी सदर माहीतीस बातमिच्या स्वरुपात व्यापक प्रसिध्दी देण्याचे दृष्टीने विनामुल्य प्रसिध्द करण्याची कार्यवाही करावी.

**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**
**अकोला**
जिल्हादंडाधिकारी,अकोला